# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २८.०५.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २७.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमांवर कारवाई करून ८,५४०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये १८ ईसमांवर कारवाई करून, ५६,०२५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४०७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,८८,०००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) तहसिल पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हे दाखल.**

दिनांक २७.०५.२०२६ चे १२.०० वा. ते १४.०५ वा. चे दरम्यान, तहसिल पोलीसांचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांनी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, १) भानखेडा, जावेद आटा चक्की जवळ, मोमीनपुरा येथील सिराज पटेल यांचे घराचे बाजुला असलेल्या एका लहान रूममध्ये पाहणी केली असता, त्याठिकाणी ०४ गोवंशीय लहान मोठी जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेल्याचे दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, आरोपी सैजाद अल्ताफ कुरेशी, वय २६ वर्षे, रा. भानखेडा, जावेद आटा चक्की जवळ, मोमीनपुरा याने नमुद गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले.

तसेच, २) डोबीनगर, रेल्वे लाईन पटरीचे बाजुला पिरू लिडर चे घराजवळील एका पत्राचे शेडमध्ये पाहणी केली असता, त्याठिकाणी ०७ गोवंशीय लहान मोठी जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवल्याचे दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, आरोपी गुड्डु उर्फ दादा सलीम अन्सारी, वय २५ वर्षे, रा. डोबीनगर, पिरू लिडर चे घराजवळ, तहसिल, नागपुर याने नमुद गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले.

दोन्हीही घटनास्थळावरून एकुण ११ गोवंशीय जनावरे एकुण किंमती १,९५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गोरक्षण, धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस ठाणे तहसिल येथे दोन्ही आरोपीविरूध्द कलम ५, ५(ब), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम–१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११ प्राणी क्रुरता अधिनियम–१९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्रीमती अनिता मोरे सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग), वपोनि. संजय मेंढे यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. रसुल शेख, मपोउपनि. गायत्री भरडे, सफौ. राजेश ठाकुर, पोहवा. संजय शाहु, पोअं. पवन साखरकर, वैभव कुलसुंगे व सुनिल यांनी केली.

## (गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे कळमना :– घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २७.०५.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, कळमना पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, सुभान नगर, हनुमान मंदीर जवळुन जात असता, तेथे एक ईसम शस्त्रासह धुमधाम व आरडा–ओरड करतांना दिसल्याने, त्याचे जवळ जात असता तो पोलीसांना पाहुन पळाला. त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेवुन निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव, सुरज सितारामजी तिडके, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट नं. ४२८/२५, सुभान नगर, कळमना, नागपुर असे सांगीतले. त्याचे ताब्यातुन लोखंडी सत्तुर किंमती ५००/–रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने सत्तुर घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोउपनि. संतोषकुमार रामलोड यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. रोशन राऊत ९७२०७३७४५२ यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे राणाप्रताप नगर :– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी भाईदेवमुनी सुखदेवमुनी नांदेडकर, वय ३३ वर्षे, रा. घर नं. ७९, गुरूदेव नगर, जकाते विद्यानिकेतन समोर, नागपूर हे महानुभाव पंथीय भिक्षुक असुन, त्यांना व त्यांचे ईतर ०६ भिक्षुक महानुभावपंथी सहकारी यांचे राहणेकरीता फ्लॅट खरेदी करावयाचा असल्याने, पाहणी करीत असतांना त्यांची ओळख आरोपी १) अमोघ संदीपराव कपाटे, वय २५ वर्षे, २) श्रीमती श्रध्दा बिडकर (क्षिरसागर), वय २७ वर्षे, ३) संदीपराव कपाटे, वय ३९ वर्षे, सर्व रा. फ्लॅट कं. ९०३, वनअनुष्का अपार्टमेंट, दिनदयाल नगर, राणाप्रताप नगर, नागपुर यांचे सोबत झाली. आरोपींनी फिर्यादी व त्यांचे ईतर सहकारी यांचा विश्वास संपादन करून, वरील फ्लॅट हा त्यांचे मालकीचा असुन, तो विकायचा आहे, असे सांगुन फ्लॅट विक्रीचा १ कोटी ८० लाख रूपयात सौदा केला. दिनांक १४.०६.२०२५ ते दिनांक २१.०५.२०२६ चे दरम्यान, आरोपींनी संगणमत करून फिर्यादी व त्यांचे ईतर सहकारी यांचेकडुन वेळोवेळी ५१,३९,०००/–रू. घेतले. त्यानंतर आरोपींनी टाळाटाळ केल्याने, फिर्यादी यांनी चौकशी केली असता, नमुद फ्लॅट हा निखील जवंजाळ यांचे नावे असल्याचे समजले. फिर्यादी यांनी विचारणा केली असता, आरोपींनी टाळाटाळ करून, रककम परत न करता, फिर्यादी व ईतर सहकारी यांचा अन्यायाने विश्वासघात करून, त्यांची ५१,३९,०००/– रू. ची फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे मपोउपनि. शकुंतला गोबाडे ७७७६०८४१०७ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे तहसिल</u> :—** दिनांक २८.०५.२०२६ चे ०८.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसिल हद्दीत, रंभाजी रोड, रेमन्ड रिचमॅन टेलर्स दुकान समोर पुलाखाली एक अनोळखी पुरूष ईसम अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल नेले असता, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतक इसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे तहसिल येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे तहसिल येथे पोउपनि. राजेश मादेवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :—** सौ. चंपा धिरज मस्के, वय ५७ वर्षे, रा. प्लॉट नं. ९८, बिनाकी मंगळवारी, इंदीरा नगर, यशोधरानगर, नागपूर ह्या दिनांक २३.०५.२०२६ रोजीपासुन पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब, अंगात— काळ्या रंगाची साडी व ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



सौ. चंपा

**स्वा/—**

**( राहुल रोटे )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**